मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/ 1712/2023-24 दि. 17/10/2023

**सेवानिवृत्त अधिकारी सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबत.**

## ।।जाहीर सूचना।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका नगररचना, सार्वजनिक बांधकाम व मिळकत विभागासाठी शासनाकडील विकासाची योजना, क्लस्टर योजना तसेच न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी शासकीय/निमशासकीय वर्ग-01/वर्ग-02 मधील पदावर कामकाज केलेल्या अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून खालील पदासाठी सेवाकरार पध्दतीने निवड करणेकरीता इच्छुक व पात्र उमेद्वारांकडून अर्ज मागवित आहेत. इच्छुक उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दि.30/10/2023 रोजी सायं.4:00 वाजेपर्यंत आवक-जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाव्दारे किंवा स्वहस्ते अर्ज करावयाचे आहेत. पोस्टाच्या विलंबामुळे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही. अथवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नसून अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर खालील पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

खालील अ.क्र.1 ते 3 मधील पदांसाठी अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची दि.01/11/2023 रोजी मुलाखत घेण्यात येईल. परंतू अ.क्र.1 ते 3 पदासाठी उमदेवार उपलब्ध न झाल्यास दि.07/11/2023 रोजी उमदेवारांचे अर्ज घेण्यात येऊन दि.08/11/2023 रोजी मुलाखत घेण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | विवक्षित कामे | शैक्षणिक अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1. | विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) | 01 | 1. क्लस्टर योजना<br>2. महानगरपालिकेच्या आरक्षित जागांचे भूसंपादन प्रक्रिया राबविणे तसेच त्यासंबंधीची न्यायालयीन प्रकरणे हाताळणे. | शासकीय/निमशासकीय सेवेत वर्ग-01 मधील पदावर किमान 05 वर्षे अथवा वर्ग-02 मधील पदावर 10 वर्षाचा नगररचना विभागात कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| 2. | नायब तहसिलदार (सेवानिवृत्त) | 01 | महानगरपालिकेच्या आरक्षित जागांचे भूसंपादन प्रक्रिया राबविणे. | अ) शासकीय/निमशासकीय सेवेत वर्ग-02 मधील पदावर किमान 05 वर्षे महसुल विभागात कामकाजाचा अनुभव असणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आवश्यक आहे.<br>ब) भूसंपादन विभागात कामकाज केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| 3. | उपअभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) | 01 | 1.महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांचे Valuation करणे.<br>2.महानगरपालिकेच्या विविध प्रकरणांचे TDR व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | शासकीय/निमशासकीय सेवेत वर्ग-01 मधील पदावर किमान 05 वर्षे अथवा वर्ग-02 मधील पदावर 10 वर्षाचा सार्वजनिक बांधकाम विभागात कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |

➢ **<u>अटी व शर्ती</u>** :-

1) अ.क्र.1 ते 3 पदासाठी उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेमधुन वर्ग-01/वर्ग-02 मधील पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2) **सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 तसेच शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-2715/प्र.क्र.100(भाग-1)/13, दि.08/09/2023 निर्णयातील सर्व अटीशर्ती बंधनकारक राहतील.**
3) दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक वेतन व भत्ते लागू राहतील.
4) करारपध्दतीने नेमणूकीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
5) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
6) सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
7) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
8) उमेदवाराने अर्जामध्ये सेवानिवृत्त आदेशाची छायांकित प्रत व कामकाजाचे अनुभव, राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावे.
9) उमदेवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.
10) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
11) सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवाराला रु.100/- स्टॅम्पपेपरवर बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
12) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

13) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

14) **निवड प्रक्रिया** :-

**अ.क्र.1 ते 3 मधील प्रत्येक पदासाठी मुलाखत 50 गुणांची असुन, गुणानुक्रमे उमदेवारांची निवड करण्यात येईल.**

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

17/10/23

(अनिकेत मानोरकर)
अतिरिक्त आयुक्त (1)
मिरा भाईंदर महानगरपालिका